रे. दिवाणी मुकदमा क्र. २८१/२०२१ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश
(उत्तम सुर्यवंशी वि लिलावती सुर्यवंशी)
(CNR No. MHSN130007402021)

१. वादी यांनी सदरचा दावा निरंतर ताकीदीसाठी प्रवादी यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. व त्याअंतर्गत तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी अर्ज केलेला आहे.

२. वादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद सादर केला की तातडीचा आदेश प्राप्त करणे आवश्यक असलेने वादीचा अर्ज ऐकणेत यावा. त्यांनी आपल्या युक्तीवादात पुढे म्हटले आहे की वादी व प्रवादी यांच्या जमिनी एकमेकांलगत असून प्रवादीच्या मिळकतीला लागून दक्षिणेला वाहता रस्ता आहे. वादीला वाहत्या रस्त्यापर्यंत पोहाचण्यासाठी प्रवादी यांच्या मिळकतीच्या पूर्व बाजूकडून येणेजाणेसाठी मुळ वाट होती. प्रवादी यानी त्यांच्या घरातील बांधकाम करत असताना दांडगाव्याने वादीची वाट बंद करणेसाठी मोकळया क्षेत्रावर बांधकाम करणेस सुरवात केलेली आहे. त्यामुळे एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करणेविषयी त्यांनी विनंती केली.

३. वादी यांनी दाव्याच्या कामी खरेदीपत्राच्या नकला व इतर सर्व कागदपत्र व फोटोपण सादर केलेले आहेत. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी यांनी त्यांच्या वाटेमध्ये बांधकाम केलेस त्यांना मुख्य रस्त्याकडे जाणेस कोणतीही वाट रहात नाही. वादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन ती गोष्ट स्पष्ट होते. त्यामुळे एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेशाद्वारे प्रवादी यांनी वादी यांना दक्षिणेकडील रस्त्यास जातेवेळी अडथळा निर्माण होवू नये अशाप्रकारे बांधकाम करणेस मनाई करणेत येते ती ता. २५/१०/२०२१ पर्यंत.

४.        एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेशाची नोटीस प्रवादी यांना देणेत यावी ज्याची परताव्याची तारीख २५/१०/२०२१.

५.        वादी यांनी सी.पी.सी ऑर्डर ३९ रुल ३ प्रमाणे पुर्तता करुन घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2021.09.23 17:11:45 +05'30'

कडेगांव                                   (वि.रा. घराळ)
दिनांक – २३/०९/२०२१          दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.G. Buchade, (Grade III) |
| Court | : Civil Judge, Jr. Dn., & J.M.F.C., Kadegaon |
| Date | : 23/09/2021 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 23/09/2021 |
| Order uploaded on | : 23/09/2021 |